सकाळ
कोल्हापूर, शनिवार,
२७ फेब्रुवारी २०१६

# अंध विद्यार्थ्यांनी जिंकली मने



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय अंध संघटनेचे (नॅब) ऑर्केस्ट्रा आयडियल स्टार्सचे कलाकार गीत सादर करताना. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

कोल्हापूर, ता. २६ : विठ्ठल विठ्ठल, विसरू नको रे आई-बापाला, अशी एकापेक्षा एक गीते सादर करत अंध विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त लोककला केंद्रात कार्यक्रम झाला. राष्ट्रीय अंध संघटनेच्या (नॅब) ऑर्केस्ट्रा आयडियल स्टार्सतर्फे गीतांचे सादरीकरण झाले.

'ओंकार स्वरूपा' गीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर प्रणय बेलेकरने 'होशवालों को खबर क्या' ही गझल सादर केली आणि उपस्थितांनी टाळ्यांची दाद दिली. दीपक कारंजकर व स्वप्नाली बेरदाळेने 'हर करम अपना करेंगे,' गीताने देशभक्तीची आस मनामनात फुलवली. कविता कारंजकरने 'एकवीरा आई,' व सतीश हिरकुडेने 'विसरू नको रे' ही गीते सादर केल्यानंतर स्वप्नालीने 'येऊ कशी तशी मी नांदायला' ही लावणी सादर केली. या लावणीला विद्यार्थी अक्षरशः डोलले. प्रणयने 'काळूबाई,' विनायक पाटीलने 'जीवा शिवाची बैलजोड', तर शुभम चौगलेने 'मोहब्बत बरसा दे ना तू' हे गीत सादर केल्यावर विद्यार्थ्यांनी शिट्यांची दाद दिली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‍घाटन झाले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अविनाश पाटील, विनायक चौगुले, शुभम चौगुले, संचालक डॉ. एम. बी. डोंगरे, डॉ. एन. बी. शेख उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले.